# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

# पोलीस भरती सन 2024-25 मधील उमेदवारांना सुचना

1. शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी येताना उमेदवाराने त्यास देण्यात आलेले **प्रवेशपत्र, ऑनलाईन आवेदन** अर्जाची छायांकीत प्रत, **आधारकार्ड** ,तसेच **दोन फोटोसह** स्वत:ची **ओळख पटविण्यासाठी** सोबत घेवुन यावे. त्याशिवाय मैदानात प्रवेश देण्यात येणार नाही.

2. आधारकार्ड, आवेदन अर्ज व प्रवेशपत्र यावरील फोटोची प्रत्यक्ष उमेदवाराच्या चेह-यावरुन पडताळणी केल्यानंतरच कळंबोली - तळोजा रोडच्या बाजुच्या प्रवेशद्वारातुन उमेदवारास मैदानात प्रवेश देण्यात येईल.

3. उमेदवाराची कागदपत्र पडताळणी लवकर होउन मैदानी चाचणीकरिता त्यास लवकर प्रवेश मिळण्यासाठी त्यांनी मैदानी चाचणीस येण्यापुर्वीच त्यांची मुळ शैक्षणिक व इतर कागदपत्रे पुढील क्रमाने तयार ठेवावित :- **(मैदानी चाचणीचे Call Letter, आवेदन अर्ज, 10 वी व 12 वी गुणपत्रक व प्रमाणपत्र, उच्चतम शिक्षणाचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला / जन्मदाखला / बोनाफाईड प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, अधिवास (Domicile) प्रमाणपत्र, समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र, N.C.C प्रमाणपत्र, MS-CIT प्रमाणपत्र, वाहन चालक परवाना)** तसेच वरील क्रमानेच कागदपत्रांचा एक छायांकित संच (self attested) 02 फोटोसह सोबत तयार ठेवावा.

4. जे उमेदवार लांब राहत असल्याने मैदानी चाचणीच्या आधीच्या रात्री येणार आहेत त्यांच्यासाठी पोलीस मुख्यालय, कळंबोली येथील हॉस्टेल मध्ये वास्तव्याची नि:शुल्क व्यवस्था करण्यात आली आहे.

5. मैदानी चाचणीस येणा-या उमेदवारांकरिता त्यांचे सामान ठेवायची व्यवस्था केली आहे. परंतु सदरचे सामान त्यांनी त्यांचे जबाबदारीवर ठेवावे.

6. मैदानी चाचणी दरम्यान उमदेवारांना सशुल्क अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याकरिता त्यांनी पुरेसे सुटे पैसे स्वत: जवळ ठेवावेत.

7. मैदानी चाचणी करिता उमेदवारांना स्पाईक शुज वापरण्यास मनाई आहे.

8. उमेदवारांनी स्वत:बरोबर कोणत्याही मौल्यवान वस्तु आणु नयेत.

9. भरती प्रक्रिया सुरु असतांना किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे /प्रमाणपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा निवड होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार /गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड/ नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल. त्याबाबत कोणताही दावा / तक्रार करण्यास कोणताही हक्क राहणार नाही.

10. पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी शारीरिक चाचणी दरम्यान उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा /नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. त्याकरिता उमेदवाराने स्वत:ची शारिरीक क्षमता विचारात घेऊन मैदानी चाचणीच्या प्रकारात सहभागी व्हावे.

11. भरती प्रक्रियेमधील कोणत्याही चाचणीसाठी येण्या/जाण्याकरिता उमेदवारांस प्रवास खर्च दिला जाणार नाही. उमेदवारास प्रत्येक पोलीस भरती चाचणीकरिता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

12. आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वीच्या दिनांकाची असावीत व सदरची मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

13. उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान गैरशिस्त व अशोभनीय वर्तन केल्यास त्यास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

14. उमेदवाराने चुकीची अथवा खोटी माहिती दिल्यास त्याची उमेदवारी कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

15. भरती प्रक्रियेदरम्यान शारिरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

16. शारिरिक चाचणीच्या वेळी Steroid सारखे **उत्तेजन द्रव्य** घेतल्याचे अथवा बॅगेमध्ये उत्तेजन द्रव्य आढळल्यास त्या उमेदवाराला भरती प्रक्रियेतुन बाद करुन त्याच्या विरुद्ध **दखलपात्र** स्वरुपाची कारवाई करण्यात येईल.

17. पोलीस भरतीतील प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

Sanjaykumar Surgounda Patil

Digitally signed by Sanjaykumar Surgounda Patil
Date: 2026.03.04 12:56:11 +05'30'

ठिकाण :- नवी मुंबई

(संजयकुमार पाटील)
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय
नवी मुंबई

दिनांक :- ०४.०३.२०२६